**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
Chhatrapati Sambhajinagar– 431 004,
Maharashtra, India
NAAC 'A⁺' Grade
Office : Syllabus Section

स्थापना वर्ष : १९५८

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**
छत्रपती संभाजीनगर-४३१ ००४,
महाराष्ट्र, भारत
नॅक 'अ⁺' दर्जा प्राप्त
कार्यलय : अभ्यासक्रम विभाग

| Syllabus Section : (0240)2403209/ 2403120 | Web Site : www.bamu.ac.in | http://bamu.digitaluniversiy.ac | Email. Syllabus.unt@bamu.ac.in |
|---|---|---|---|

संदर्भ क्रं. अभ्यासक्रम विभाग/२०२६/3942-4441 दिनांक : २५/ ०५/ २०२६.

प्रति,
सर्व प्राचार्य/संचालक,
विद्यापीठाशी सर्व संलग्नीत महाविद्यालये,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर.

**विषयः-उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन प्रवेश शुल्क माहितीबाबत.**

**संदर्भः-मा. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.उशिसं/प्रवेश शुल्काबाबत/मवि-१/२०२६/ई./६८४, दिनांक १३ मे, २०२६.**

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने मा. कुलगुरु महोदय यांच्या आदेशान्वये आपणास कळविण्यात येते की, संदर्भिय पत्रानुसार मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी कळविले आहे की, उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन प्रवेश शुल्क माहितीबाबत उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (इ. १२ वी) चा निकाल जाहिर झाला असून सर्व महाविद्यालयांमध्ये पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे/ होत आहे. त्यानुषंगाने प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेताना विद्यापीठ/ शुल्क नियामक प्राधिकरण यांच्या नियमानुसार व मान्यतेनुसार प्रवेश शुल्क जसे की, टयुशन फी, डेव्हलपमेंट आणि इतरा (Other Fee) शुल्काबाबतची अद्यावत माहिती महाविद्यालयाच्या दर्शनी भागात सूचना फलकावर लावणे अनिवार्य करण्यात यावे, तसेच सदर प्रवेश शुल्काबाबतची संपूर्ण माहिती (शुल्कासहित) महाविद्यालयाचे प्रवेश माहिती पुस्तिकात (Prospectus) असणे आवश्यक असल्याचे या पत्राद्वारे अनिवार्य करण्यात येते आहे. तसेच सुचना फलकावरील प्रवेश शुल्काबाबतची माहिती आणि प्रवेश माहिती पुस्तिकेतील शुल्काबाबतची माहिती सर्व प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांना प्रवेशापूर्वी माहिती करुन देणे ही जबाबदारी संबंधीत महाविद्यालयाची राहील. करिता सर्व महाविद्यालयांनी संदर्भिय पत्रानुसार त्वरित कार्यवाही करावी.

सोबतः- महाराष्ट्र शासनाच्या पत्राची प्रत जोडली आहे.

कुलसचिव

JK25052026/-*

# महाराष्ट्र शासन
## उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
### ४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२११९


क्र. उशिसं/प्रवेश शुल्काबाबत/मवि-१/२०२६/ई. /684 दि. मे.२०२६ 13 MAY 2026

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण

२. कुलसचिव,
राज्य सार्वजनिक विद्यापीठे

विषयः- उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन प्रवेश शुल्क माहितीबाबत.

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, नुकताच उच्च माध्यामिक शिक्षण मंडळ ( इ.१२ वी) चा निकाल जाहिर झाला असून सर्व महाविद्यालयांमध्ये पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रकिया सुरू झाली आहे/होत आहे. त्यानुषंगाने प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेताना विद्यापीठ/ शुल्क नियामक प्राधिकरण यांच्या नियमानुसार व मान्यतेनुसार प्रवेश शुल्क जसे की, टयुशन फी, डेव्हलपमेंट आणि इतर (other fee) शुल्काबाबतची अद्यावत माहिती महाविद्यालयाच्या दर्शनी भागात सूचना फलकावर लावणे अनिवार्य करण्यात यावे, तसेच सदर प्रवेश शुल्काबाबतची संपूर्ण माहिती (शुल्कासहित) महाविद्यालयाचे प्रवेश माहितीपुस्तिकात (Prospectus) असणे आवश्यक असल्याचे या पत्राद्वारे अनिवार्य करण्यात येत आहे. सुचना फलकावरील प्रवेश शुल्काबाबतची माहिती आणि प्रवेश माहिती पुस्तिकेतील शुल्काबाबतची माहिती सर्व प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांना प्रवेशापूर्वी माहिती करुन देणे ही जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहील.

सदर शुल्काबाबतची माहिती सुचना फलक आणि प्रवेश माहितीपुस्तिकेमध्ये दिल्याबाबतची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित विद्यापीठ आणि संबंधित विभागीय सहसंचालक यांची राहील.

तरी सर्व संबंधित विभागीय सहसंचालक आणि कुलसचिव, सर्व राज्य सार्वजनिक विद्यापीठे यांनी सदर बाब आपल्या अधिनस्त आणि संलग्नित महाविद्यालयांना आपल्या स्तरावरुन तात्काळ सूचित करण्यात यावी. तसेच यासंदर्भात कोणत्याही प्रकराची तक्रार उद्भवणार नाही याची दक्षता संबंधित महाविद्यालयांनी घ्यावी. तसेच कोणत्याही प्रकराची तक्रार उदभवल्यास संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील.

DR Acad / DR Syllabus - 1032085
1032084

14 MAY 2026

( डॉ. शैलेंद्र देवळाणकर )
प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१६

प्रतः-१. मा.स्वीय सहाय्यक मा.मंत्री उच्च व तंत्र शिक्षण महाराष्ट्र राज्य
२. मा.अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग , मंत्रालय विस्तार भवन, मुंबई

DR (Syllabus)